**मजूर सहकारी संस्थांच्या व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या कामाच्या सवलतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्र.सीएटी-२०२३/प्र.क्र.१४४/इमा-२**
मादाम कामा रोड, हूतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई४०००३२
दिनांक:- २८/०२/२०२४

**वाचा :-** १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.१०३/इमा-२, दि.२७/०९/२०१८.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.६९/इमा-२, दि.१६/११/२०१८.
३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.सीएटी-०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा-२, दि.२९/०७/२०२१.

**प्रस्तावना :-**

मजूर सहकारी संस्थांच्या कामाच्या सवलतीत दि.२७/०९/२०१८च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली होती. तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या सवलतीमध्ये दि.१६/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली होती. मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या सवलतीमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

**शासन निर्णय** :-

१) **मजूर सहकारी संस्था यांना कामे देण्याची मर्यादा (स्थापत्य कामे)** :-

अ) कामे देण्यासाठी मजूर सहकारी संस्थांची सुधारीत वर्गवारी पुढीलप्रमाणे राहील -
"अ" वर्ग उच्चतम पात्रता रु.३०,००,०००/- ऐवजी रु.५०,००,०००/- (रु.५० लक्ष)
"ब" वर्ग उच्चतम पात्रता रु.१५,००,०००/- ऐवजी रु.२५,००,०००/- (रु.२५ लक्ष)

ब) मजूर सहकारी संस्थांना वर्षभरात एकूण रु. १०० लक्ष मर्यादेपर्यंत कामे घेता येत होती. आता या मर्यादेत वाढ करण्यात येत असून या संस्थांना वर्षभरात एकूण रु. ३०० लक्ष मर्यादेपर्यंत कामे घेता येतील. नवीन मजूर सहकारी संस्थेने प्रथमत: रु. ३० लक्ष पर्यंतचे काम यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर रु. ५० लक्ष पर्यंतची ५ अथवा अधिक कामे मिळून एकूण रु.३०० लक्ष रकमेची कामे प्रतिवर्षी देता येतील. कार्यकारी अभियंता यांनी मजूर सहकारी संस्थेस कामाचे कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित मजूर सहकारी संस्थेच्या पासबुकात नोंद घ्यावी आणि या संस्थेच्या पासबुकातील नोंदीपासून एका वर्षात एकूण रु. ३०० लक्षपेक्षा जास्त रकमेची कामे दिली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

क) मजूर सहकारी संस्थांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील "अ" व "ब" वर्गीकरणाचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना राहतील.

२. **स्थापत्य बेरोजगार अभियंता यांच्या कामाबाबत** :-

अ) स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना रु. १०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे विनास्पर्धा देण्यात येत होती. आता या मर्यादेमध्ये वाढ करुन स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना १० वर्षाच्या कालावधीत एकूण रु.३०० लक्ष किंमतीची कामे विनास्पर्धा देण्यात येतील. ज्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना १० वर्षाच्या कालावधीत रु.३०० लक्ष रकमेची कामे विनास्पर्धा देण्यात आली नसतील अशा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांची मूळ १० वर्षे पर्यंतची नोंदणी मर्यादा त्यांच्या रु.३०० लक्ष रकमेचा कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील ५ वर्षापर्यंत वाढविण्यात येत आहे.

ब) स्थापत्य बेरोजगार अभियंता यांना देण्यात येणाऱ्या कामाची कमाल मर्यादा रु.३० लक्ष होती. आता स्थापत्य बेरोजगार अभियंता यांना देण्यात येणाऱ्या कामाची कमाल मर्यादा रु. ३० लक्ष

वरुन रु. ५० लक्ष पर्यंत करण्यात येत आहे. ज्यांनी रु. ३० लक्ष किंमतीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे त्यांना सदर सवलत उपलब्ध राहील.

३. **<u>मजूर सहकारी संस्था व बेरोजगार अभियंत्यांचे काम वाटप</u>** :-

अ) रु.५० लक्ष किंमतीपर्यंतच्या कामांचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात करण्यात यावे.

ब) मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या ३३% कोट्यातील रु.१० लक्ष (सर्व कर अंतर्भूत करुन) पर्यंतची कामे मजूर सहकारी संस्थांच्या काम वाटपासाठी सहकार विभागाने स्थापित केलेल्या जिल्हास्तरावरील काम वाटप समिती करेल व त्यावरील रु. ५० लक्ष पर्यंतची कामे ई-निविदा प्रणाली राबवून देण्यात यावी.

क) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना त्यांच्या ३३% कोट्यातील रु. १० लक्ष (सर्व कर अंतर्भूत करुन) पर्यंतची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम वाटपासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने स्थापित केलेल्या जिल्हा स्तरावरील काम वाटप समितीमार्फत करण्यात यावे व त्यावरील रु. ५० लक्ष पर्यंतची कामे ई-निविदा प्रणाली राबवून देण्यात यावी.

ड) रु. ५० लक्ष किंमतीपर्यंतच्या कामांबाबत पात्र नोंदणीकृत कंत्राटदारांसाठी त्यांच्या कोट्यातील ३४% कामांचे वाटप करण्यासाठी रु.१० लक्ष (सर्व कर अंतर्भूत करुन) पर्यंतच्या कामांसाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात व त्यावरील रु. ५० लक्ष पर्यंतची कामे ई-निविदा प्रणाली राबवून देण्यात यावी.

सदर आदेश जलसंपदा विभाग, सहकार व पणन विभाग, कृषि व पदुम विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२२८१६३०५९५११८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DIPALI PRADEEP GHORPADE

Digitally signed by DIPALI PRADEEP GHORPADE
DN: c=IN, o=PERSONAL, title=2574,
pseudonym=42119cf54e494087b5182b557516d201,
2.5.4.20=8fdc37406c155f20f5ae0988e9a1c7b6a744659f8b36110f5f0f8280ca07337d, postalCode=415519, st=Maharashtra,
serialNumber=c5855ef7a773be6fd8251ed7d445fc477ec7a301e0a190847d151267a928a7ff, cn=DIPALI PRADEEP GHORPADE
Date: 2024.02.28 16:40:59 +05'30'

**( दिपाली प्रदीप घोरपडे )**
**अवर सचिव (इमारती)**

**प्रति,**

अपर मुख्य सचिव (सा.बां), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (बांधकामे)/सचिव (रस्ते), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई
सर्व अधिक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळ
प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित मुंबई
महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
कार्यासन इमारती-२ (निवडनस्ती)